मा. कोर्टाकरिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** पलूस

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0006  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/01/2024 18:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 08/01/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2024
   **Time From (वेळेपासून):** 12:46 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/01/2024  **Time (वेळ):** 18:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/01/2024 18:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पलूस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदेश अजित लाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | क्रांतीनगर चौक कुंडल,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | क्रांतीनगर चौक कुंडल,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.बाबुराव बाळासो जाधव बाळासो जाधव जाधव | | | 1. कुंभार वाडा, रामानंदनगर,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | (बत्तीस हजार रुपये) रोख रक्कम | 32,000.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

32,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि. 08.01.2024

मी संदेश अजित लाड, वय 24 वर्ष व्यवसाय:- शिक्षण (एम.बी.ए.) रा. क्रांतीनगर चौक कुंडल ता.पलूस जि. सांगली. मो.नं.9595617373

मी वरील ठिकाणी माझे वडील श्री.अजित आप्पासो लाड व आई सौ.स्वाती अजित लाड असे एकत्रीत राहणेस आहे. दि. 12.12.2023 रोजी आम्ही पलूस येथील गट नं.68/11 मधील माझे नावे खरेदी दस्त क्र. 4795/2023 अन्वये 2.5 गुंठे व खरेदी दस्त क्र.4796/2023 अन्वये 2.5 गुंठे अशी एकुण 5 गुंठे जमिन व वडील श्री.अजित आप्पासो लाड यांचे नावे खरेदी दस्त क्र.4797/2023 अन्वये 2.5 गुंठे व खरेदी दस्त क्र. 4798/2023 अन्वये 2.5 गुंठे अशी एकुण 5 गुंठे अशी एकुण 10 गुंठे जमिन दुय्यम निबंधक पलूस यांचे कार्यालयात खरेदी दस्ताव्दारे खरेदी केली आहे. सदर जमिनीची 7/12 सदरी माझे व वडीलांचे नावाची नोंद धरणेसाठी बाबुराव जाधव, तलाठी पलूस यांनी माझेकडे प्रत्येक खरेदी दस्ताचे नोंदीकरीता 10,000/- रूपये प्रमाणे एकुण 4 खरेदी दस्ताचे मिळून 40,000/- रूपये लाचेची मागणी केली. मला श्री. बाबुराव जाधव, तलाठी पलूस यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.05.01.2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना संपर्क करून माझी बाबुराव जाधव, तलाठी पलूस यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी पथकासह पलूस एमआयडीसी येथे दुपारी 02:00 वा चे सुमारास येत असल्याचे सांगून सदर ठिकाणी मला हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील किया सेलटॉस कार एमएच-10-डीक्यु-0200 मधून एमआयडीसी पलुस येथे जावून पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला त्यांचेकडील शासकीय वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी सोबत असले पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी साहेब व सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पाटील साहेब, पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी साहेब व पंचांना माझी श्री. बाबुराव जाधव, तलाठी पलूस यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता पुजारी साहेब यांनी मला लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक पुजारी साहेब व दोन्ही पंचानी वाचून सहा केल्या.

त्यानंतर श्री. बाबुराव जाधव, तलाठी पलूस यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पुजारी साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली व सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. नितीन विलास कोकणे यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. संतोष अंबादास जाधव यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 कोकणे असे माझेकडील किया सेलटॉस कार एमएच-10-डीक्यु-0200 मधून रवाना होवून तलाठी कार्यालय पलूस येथे दाखल झालो. तलाठी कार्यालय पलूस येथे तलाठी जाधव हे हजर नसल्याने मी त्यांना माझे मोबाईलवरून फोन केला असता तलाठी जाधव यांनी मला पंचायत समितीजवळ आलेनंतर फोन करीत असलेचे सांगितलेने मी व पंच कोकणे असे माझेकडील कारने पंचायत समिती पलूस येथे गेलो. काही वेळाने तलाठी जाधव यांनी मला संपर्क करून पोलीस स्टेशनजवळील हॉटेल एेश्वर्या येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच कोकणे असे माझे कारने पंचायत समिती येथून रवाना होवून हॉटेल एेश्वर्या येथे जावून तलाठी बाबुराव जाधव यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांचेशी आमचे नोंदींचे कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी मी तलाठी जाधव यांना "बोला की काय करायच" असे म्हणालो. त्यावर तलाठी जाधव यांनी "नोंदी मारून ठेवल्यात" असे सांगुन नोंदी संदर्भात चर्चा करून "संपवून टाका



Scanned with OKEN Scanner

विषय पटदिशी, सोमवारी, मंगळवारी उतारा मिळेल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काय विषय म्हायत न्हाय मला काय असतय काय न्हाय" असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला "दहा हजारान एक नोंद धरायला लागत्या" असे सांगितले. त्यावर मी त्यांना "जरा काय तर कमी करा की" असे म्हणालो असता तलाठी श्री.जाधव यांनी "तुमच्या इच्छेने कमी करा आणि विषय संपवा....आम्ही पंधरा ते विस हजार घेतो नोंदीच" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "सात, आठ हजार रूपया" पर्यंत कमी करणेबाबत विनंती केली असता तलाठी श्री.जाधव यांनी "तुमच तुम्ही विषय संपवा आणि द्या आमची काय अडचण न्हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "सोमवारी देवु का तुम्हाला" असे विचारले असता तलाठी श्री.जाधव यांनी "करा की, नाय अडचण, सोमवारी असतो बारा एकच्या पुढ" असे म्हणुन तलाठी श्री.जाधव हे निघुन गेले. त्यानंतर मी व पंच कोकणे असे माझेकडील कारने ए्ेश्वर्या हॉटेल येथून रवाना होवून पुजारी साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. पुजारी साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व पंच कोकणे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पुजारी साहेबांनी तलाठी बाबुराव जाधव यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, तलाठी जाधव यांनी माझे व माझे वडीलांचे नावे खरेदी केलेल्या जमिनीची नोंद 7/12 सदरी धरल्याचे मोबदल्यात व सदर जमिनीचा 7/12 उतारा देणेसाठी प्रत्येक खरेदी दस्ताचे नोंदीसाठी 10,000/- रूपये प्रमाणे एकुण 4 खरेदी दस्ताचे नोंदीसाठी 40,000/- रूपयांची मागणी करून, तडजोडीअंती प्रत्येक नोंदीसाठी 8,000/- रूपये प्रमाणे एकुण 4 नोंदीचे 32,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम सोमवार दि. 08.01.2024 रोजी घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पुजारी साहेबांनी दि. 08.01.2024 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन संपर्क केल्यानंतर लाच रक्कम घेवून हजर राहण्याचे सुचना दिल्या.

आज दि. 08.01.2024 रोजी पुजारी साहेबांनी मला 11.00 वा संपर्क करून पलूस एमआयडीसी येथील पाण्याचे टाकीजवळ हजर राहणेच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी माझेकडील कारने पुजारी साहेब यांचे समक्ष हजर झालो. सापळा कारवाईचे वेळ व ठिकाण निश्चित करणेकरीता पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे मी पंचांसमक्ष माझे मोबाईलवरून तलाठी जाधव यांना फोन केला असता त्यांनी मला तहसिल कार्यालयाचे खालच्या ऑफीसमध्ये येण्यास सांगितले. सदरचा कॉल पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी बाबुराव जाधव तलाठी यांचेविरूध्द तहसिल कार्यालय पलूस येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम हजर करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील शिल्लकीतील 32,000/- रूपये पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर श्री. पुजारी साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहून घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. पुजारी साहेब व मी सही केली. श्री.पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व पुजारी साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच कोकणे असे माझेकडील किया सेलटॉस कार मधून रवाना होवून तहसिल कार्यालय पलूस येथे दाखल झालो. माझे पाठोपाठ पुजारी साहेब व सापळा पथक त्यांचेकडील वाहनाने पलूस तहसिल कार्यालया आवारात दाखल झाले.

त्यावेळी मी माझे मोबाईलवरून तलाठी जाधव यांना फोन केला असता तलाठी जाधव यांनी मला तहसिल कार्यालयातील उजव्या बाजुस असले हॉलमधील तलाठी बसतात त्याठिकाणी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच कोकणे असे माझेकडील कार मधुन उतरुन तहसिल कार्यालयातील तलाठी बसतात त्या हॉल मध्ये गेलो. पुजारी साहेब व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ तहसिल कार्यालयात येवून सदर खोलीचे आजु बाजुस सापळा लावून थांबलेले दिसले. मी व पंच कोकणे असे तलाठी जाधव यांचे टेबलाचे समोर गेलो. त्यावेळी तलाठी जाधव यांनी माझेकडे बघुन त्यांचे हाताने इशारा करून लाचेची मागणी केली. त्यावेळी मी तलाठी जाधव यांना चार खरेदी दस्ताचे 8,000/- रूपये प्रमाणे एकुण 32,000/- रूपये आणले असल्याचे सांगुन मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील 32,000/- रुपये अॅथ्रासिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून तलाठी जाधव यांचेसमोर धरली असता, तलाठी जाधव यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्याचे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. लागलीच मी सदर हॉलमधून बाहेर येवून माझेकडील हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पुजारी साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून



Scanned with OKEN Scanner

थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने बाबुराव जाधव, तलाठी पलूस यांना ताब्यात घेतले.
सदर ठिकाणी पुजारी साहेबांनी तलाठी जाधव यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.बाबुराव बाळासो जाधव, वय-39 वर्षे, तलाठी पलूस वर्ग-3 रा. कुंभार वाडा, रामानंदनगर पलूस ता.पलूस जि.सांगली असे सांगीतले.

सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह पलूस येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 05.01.2024 रोजी 17.02 वा. ते 18.10 वा. च्या दरम्यान लोकसेवक श्री.बाबुराव बाळासो जाधव, वय-39 वर्षे, तलाठी पलूस वर्ग-3 रा. कुंभार वाडा, रामानंदनगर पलूस ता.पलूस जि.सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझे व माझे वडीलांचे नावे खरेदी केलेल्या जमिनीची नोंद 7/12 सदरी धरल्याचे मोबदल्यात व सदर जमिनीचे 7/12 उतारा देणेसाठी प्रत्येक नोंदीस 10,000/- रूपये प्रमाणे 4 नोंदीचे एकुण 40,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 32,000/- रूपये लाचेची मागणी करून आज दि. 08.01.2024 रोजीचे 12.46 वा ते 13.02 चे दरम्यान माझेकडुन लाच रक्कम 32,000/- रूपये तहसिल कार्यालय पलूस येथील तलाठी बसत असले संजय गांधी योजना विभागाचे हॉलमध्ये स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री.बाबुराव बाळासो जाधव, वय-39 वर्षे, तलाठी पलूस वर्ग-3 रा. कुंभार वाडा, रामानंदनगर पलूस ता.पलूस जि.सांगली यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं◌्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVIN Pundlik SALUNKE(I (Inspector)) / DGPPPSM8105 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
प्लूस पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVIN Pundlik SALI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPPPSM8105



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner